MHAU050052972025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४११/२०२५.**

**कविता गोविंद माळी व इतर**

**वि.**

**निरंक.**

**निशाणी क्रमांक १ खालील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र. १ ते ६ यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार क्र. १ ते ६ यांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील नामे गोविंद नंदु माळी हे दिनांक ०४.१०.२०२२ रोजी मयत झाले आहे. नंदु मोहन माळी यांचा मयत गोविंद नंदु माळी हा मोठा मुलगा होता. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत गोविंद नंदु माळी यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. तसेच अर्जदार क्र. ४ चे पती व अर्जदार क्र. ५ व ६ यांचे वडील तसेच अर्जदार क्र. १ हिचे सासरे व अर्जदार क्र. २ व ३ यांचे आजोबा नामे नंदु मोहन माळी हे दि. ०६.०९.२०१८ रोजी मयत झाले आहे. अर्जदार क्र. १ ते ६ यांचे व्यतिरीक्त मयत गोविंद नंदु माळी व मयत नंदु मोहन माळी यांना दुसरे अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामकाजाकरीता वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक व गरजेचे झालेले आहे; म्हणून सदरचा अर्ज अर्जदार यांनी मयत गोविंद नंदु माळी व मयत नंदु मोहन माळी यांचे कायदेशीर वारस असल्याचे ठरवून मिळण्याकरीता दाखल केला आहे.

३. अर्जदारांनी अर्ज दाखल केल्यानंतर अर्जाची जाहीर सुचना व जाहीर प्रकटन दिल्याप्रमाणे दैनिक ''मराठवाडा केसरी'' या वृत्तपत्रात दि. २९.०१.२०२६ रोजी प्रकाशित करण्यात आले व अर्जाबद्दल काही आक्षेप असल्यास न्यायालयास

कळविण्यास सांगितले, परंतू अद्याप न्यायालयास कोणताही आक्षेप प्राप्त झाला नाही.

४. अर्जदारांतर्फे विधिज्ञ श्री. रविराज शिंदेपाटील यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. प्रस्तुत अर्जाचे निर्णयाकामी खालील मुद्दे अर्जाच्या निकाल निश्चिती करीता उपस्थित झाले. त्यांचेवरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत गोविंद नंदु माळी यांचे कायदेशीर वारस व अर्जदार क्र. १ ते ६ हे मयत नंदु मोहन माळी यांचे कायदेशीर वारस असून वारसाचा दाखला मिळण्यास पात्र आहेत काय ? | होकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दा क्र.१ करीताः</u>–**

६. अर्जदारांतर्फे अर्जदार क्र.१. कविता गोविंद माळी यांनी स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र दाखल करून त्यांच्या मुळ अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे तसेच पुढे त्यांनी शपथेवर कथन केले की, अर्जदार हे मयत गोविंद नंदु माळी व मयत नंदु मोहन माळी यांचे कायदेशीर वारस आहेत. सदर अर्जासोबत अर्जदारांनी मयत गोविंद नंदु माळी व मयत नंदु मोहन माळी यांचे साक्षांकित मृत्यु प्रमाणपत्राच्या प्रतीची स्कॅन प्रत व अर्जदार यांचे साक्षांकित आधार ओळखपत्रांच्या स्कॅन प्रती दाखल केलेल्या आहेत. तद्नंतर अर्जदारांनी पुरसीस दाखल करून त्यांचा पुरावा बंद केला आहे.

७. अर्जदारांनी दाखल केलेल्या प्रस्तुतच्या अर्जास कोणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदारांतर्फे दाखल करण्यात आलेला लेखी पुरावा हा तोंडी पुराव्यास पुरक असून अबाधित आहे. अर्जदारांनी दाखल केलेला अर्ज व जाहीर प्रकटन दाखल केल्यानंतर कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदारांतर्फे अर्जदार क्र.१ यांनी दाखल केलेल्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये अर्जदार हे मयत गोविंद नंदु माळी व मयत नंदु मोहन माळी यांचे वारस असून त्यांना इतर कोणीही वारस नसल्याचे कथन केले आहे. वरील कथने विचारात घेता अर्जदार क्र. १ ते ४ हे पत्नी, मुले आणि आई या नात्याने मयत गोविंद नंदु माळी यांचे व अर्जदार क्र.१ ते ६ हे मयत नंदु मोहन माळी यांचे कायदेशीर वारस असल्याचे स्पष्ट होते.

८. अर्जदारांनी अभिलेखावरती दाखल केलेल्या उपरोक्त पुराव्याबाबत शंका घेण्याची परिस्थिती दिसून येत नाही. तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता मयत गोविंद नंदु माळी यांचे अर्जदार क्र.१ ते ४ व मयत नंदु मोहन माळी यांचे अर्जदार क्र. १ ते ६ हे कायदेशीर वारस असल्याचा निष्कर्ष काढण्यास कोणतीही हरकत नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र.२ करीताः</u>–

९. मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदविल्याने अर्जदार क्र. १ ते ४ हे पत्नी, मुले आणि आई या नात्याने मयत गोविंद नंदु माळी यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे व अर्जदार क्र. १ ते ६ हे मयत नंदु मोहन माळी यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र ठरलेले आहे. परिणामतः अर्जदारांचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता मुद्दा क्र.२ चे उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र.१. कविता गोविंद माळी, अर्जदार क्र.२. मुकुंदा गोविंद माळी, अर्जदार क्र.३.गोकुळ गोविंद माळी, अर्जदार क्र.४. लताबाई नंदु माळी हे मयत गोविंद नंदु माळी यांचे कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

३. अर्जदार क्र.१. कविता गोविंद माळी, अर्जदार क्र.२. मुकुंदा गोविंद माळी, अर्जदार क्र.३. गोकुळ गोविंद माळी, अर्जदार क्र.४. लताबाई नंदु माळी, अर्जदार क्र. ५. विशाल नंदु माळी व अर्जदार क्र.६. संगिता सुनिल मोरे हे मयत नंदु मोहन माळी यांचे कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

४. वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरीता अर्जदार यांनी नियमाप्रमाणे योग्य ते न्यायालयीन शुल्क न्यायालयात जमा करावे.

Digitally signed by SHAZIYA KHAN
Date: 2026.04.09 17:06:39 +0530

दिनांकः ०९.०४.२०२६ (**श्रीमती एस. के. खान**)

वैजापूर. २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वैजापूर.